ISSN 2319 - 359X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# IDEAL

Volume - IX Issue - II March - August - 2021

Marathi Part - III

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47026

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.601
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖

Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

VOLUME - IX, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2021
**IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601** (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | डॉ. बाबासाहेब यांचे शेतीविषयक विचार आणि सद्यस्थितीतील उपयुक्तता<br>**प्रा. डॉ. अशोक दत्तात्रय भवर** | १-५ |
| २ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार आणि सद्यस्थितीतील उपयुक्तता<br>**डॉ. मीना फकीरा पाटील**<br>**डॉ. बी. एम. सोनवणे** | ६-१० |
| ३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अर्थिक विकासातील योगदान : अर्थात राजकीय लोकशाहीची स्थापना<br>**डॉ. सुरेखा अनिल तवंदकर** | ११-१८ |
| ४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर - सामाजिक व राजकीय विचार<br>**प्रा. भागवत शंकर महाले** | १९-२६ |
| ५ | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भारतीय शेतीविषयक विचारांचे वर्तमानातील महत्व<br>**प्रा. महेंद्र रामचंद्र खंबाईत** | २७-३९ |

VOLUME - IX, ISSUE - II - MARCH - AUGUST - 2021
IDEAL - ISSN - 2319 - 359X - IMPACT FACTOR - 6.601 (www.sjifactor.com) AP- 13

# २. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार आणि सद्यस्थितीतील उपयुक्तता

**डॉ. मीना फकीरा पाटील**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, महिलारत्न पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय, मालेगांव कैम्प, जिल्हा-नाशिक.
**डॉ. बी. एम. सोनवणे**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, महाराजा सयाजीराव महाविद्यालय, मालेगांव कैम्प, जिल्हा-नाशिक.

**सारांश**

**भारतीय घटनेचे शिल्पकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संपूर्ण भारतीयांना आणि जगाला परिचय आहे. त्यांचे ज्ञान फक्त कायदेशास्त्रा पुरते मर्यादित नव्हते तर त्यांनी विज्ञानाच्या विविध शाखांमध्ये म्हणजेच समाजशास्त्र, राज्यशास्त्र, मानववंशशास्त्र, अर्थशास्त्र आणि धर्मशास्त्र या विषयावर अभ्यासपूर्ण लेखन केलेले आहे. एक महान समाजसुधारक, भारतातील पददलितांचा कैवारी, मानवी हक्कांचे संरक्षणकरर्त, शिक्षणतज्ञ, पत्रकार म्हणून त्यांना मान्यताही मिळाली. परंतु त्यांच्या बहुविध व्यक्तिमत्त्वाचा एक महत्त्वपूर्ण पैलू मात्र अजूनही दुर्लक्षित राहिलेला आहे आणि तो म्हणजे त्यांनी अर्थतज्ञ म्हणून बजावलेली कामगिरी प्रस्तुत शोधनिबंध डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांचा मागोवा घेऊन त्या आर्थिक विचारांची प्रासंगिकता आजचे अर्थिक प्रश्न समस्या सोडविण्यासाठी कसे मार्गदर्शक होऊ शकतात याविषयी अभ्यास मत मांडलेले आहे.**

**प्रास्तविक**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्थशास्त्राचे विद्यार्थी होते. त्यांनी परदेशी विद्यापीठांच्या अर्थशास्त्र या विषयातील तीन पदव्या प्राप्त केल्या होत्या.भारतात आल्यानंतर त्यांनी मुंबईच्या सिडनेहॅम महाविद्यालयात अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काही काळ नोकरी केली. 1926 मध्ये मुंबईच्या विधान मंडळावर सदस्य म्हणून नियुक्ती झाल्यानंतर अर्थसंकल्पावर त्यांची भाषणं अभ्यासपूर्ण आहेत. त्यांनी विधिमंडळात काही विधेयके मांडली. त्यामध्ये खोत पद्धती नष्ट झाली पाहिजे, सावकारी नियंत्रण, महार वतन नष्ट झाली पाहिजेत, भारतीय समाजाने त्यांच्या आर्थिक विचारांकडे दुर्लक्ष करून त्यांच्यावर अन्याय केला आहे. सर्वसामान्य माणसाच्या बाबतीत डॉ. आंबेडकर यांचे अर्थशास्त्रीय कामगिरीबद्दलच्या अज्ञानाचे ठीक आहे. परंतु अर्थशास्त्राचे अभ्यासकांचे काय? प्रस्तुत शोधनिबंधामध्ये आंबेडकरांच्या अर्थशास्त्रीय विचारांचा शोध घेऊन त्यांची प्रासंगिकता मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.**

3. सामुदायिक शेती

शेती एकत्रीकरणाने प्रश्न सुटणार नाही. डॉ. आंबेडकर यांच्या मते पडीक जमीन लागवडीखाली आणल्याने भूमिहीनांचा प्रश्न सुटू शकेल. जमीनदारांचे उच्चाटन झाल्यानंतर शेतकऱ्यांना जमिनीची वैयक्तिक मालकी न देता सरकारने जमीनीचे मालक व्हावे. याद्दष्टीने सामुदायिक शेतीवर त्यांनी भर दिला.

4. जमीन महसूल

उत्पन्नावर जमीन महसूल आकारणी अन्यायकारक आहे असे आंबेडकरांचे मत होते. सर्वांकडून सारखा कर वसूल करणे योग्य नाही. काही विशिष्ट रकमेपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्यांना जमीन महसुलात माफी मिळाली पाहिजे. म्हणूनच जमीन असूनही त्याचे 107 वे कलम रद्द करून जमीन महसूल प्राप्तिकराच्या पक्ष आणला पाहिजे असे विचार त्यांनी व्यक्त केले.

5. खोती पद्धती

डॉ. आंबेडकरांनी खोती पद्धतीविरुद्ध रत्नागिरी येथील दलित वर्गाच्या परिषदेत आवाज उठवला होता. प्रदेशातील शेतकऱ्यांचे रक्त शोषण थांबवून त्यांना माणुसकीचे हक्क मिळवून देण्यासाठी खोती पद्धती समूळ नष्ट केली पाहिजे असे त्यांचे मत होते. खोती पद्धती जमीन महसूल संहितेत येत नाही.हा स्वतंत्र विषय आहे असे ते मानत. जमीन कसणाऱ्या कुळांना वहीवाटीचे हक्क मिळावेत व रयतवारी पद्धत आणावी यासाठी मुंबई विधिमंडळात 1937 मध्ये त्यांनी खोती पद्धती रद्द करण्यासंबंधीचे विधेयक मांडले.

6. चलनविषयक आर्थिक विचार

1947 साली "हिस्ट्री ऑफ इंडियन करन्सी अँड बँकिंग"यामध्ये त्यांनी भारतासाठी आदर्श चलन पद्धती कोणती यावर आपले मूलगामी विचार मांडले आहेत. पण भारतासाठी आदर्श चलन पद्धती कोणती हा वाद निर्माण झाला. आंबेडकरांच्या चलनविषयक मतांचा विचार न करता भारत व इतरत्र केन्स यांच्या भूमिकेचा स्वीकार केला. परंतु आजची परिस्थिती पाहता त्यांची भूमिका निश्चितच योग्य होती. आज केंद्र सरकारची अर्थसंकल्पीय तूट वाढत असून रिझर्व बँकेला पतपुरवठा वाढवावा लागतो. त्यामुळे चलनफुगवटा व त्या अनुषंगाने येणारे भाववाढीची समस्येला तोंड द्यावे लागत आहे.चलननिर्मितीच्या क्षमतेवर अंकुश ठेवण्यासाठी त्यांची भूमिका भविष्याचा वेध घेणारी होती यात शंका नाही.

7. सार्वजनिक आयव्यय याविषयी अंबेडकरांचे अर्थिक विचार

"ऍडमिनिस्ट्रेशन अँड फायनान्स ऑफ द ईस्ट इंडिया कंपनी" व "दी इव्होल्यूशन ऑफ प्रोव्हिन्शियल फायनान्स इन ब्रिटीश इंडिया" या दोन्ही प्रबंधात त्यांचे सार्वजनिक आयव्यय विषयक विचार आढळतात. ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन व वित्तव्यवस्था यामध्ये सन १७७२ ते १८५८ मध्ये कसे बदल झाले व त्यांना कसे अन्यायकारक ठरले; याविषयी त्यांनी आपले विचार व्यक्त केले. दुसऱ्या प्रबंधातून टिश केंद्र सरकार आणि त्याकाळची घटक राज्य यांच्यातील आर्थिक संबंधाविषयी चे विचार व्यक्त होतात.

3. सामुदायिक शेती

शेती एकत्रीकरणाने प्रश्न सुटणार नाही. डॉ. आंबेडकर यांच्या मते पडीक जमीन लागवडीखाली आणल्याने भूमिहीनांचा प्रश्न सुटू शकेल. जमीनदारांचे उच्चाटन झाल्यानंतर शेतकऱ्यांना जमिनीची वैयक्तिक मालकी न देता सरकारने जमीनीचे मालक व्हावे. याद्दष्टीने सामुदायिक शेतीवर त्यांनी भर दिला.

4. जमीन महसूल

उत्पन्नावर जमीन महसूल आकारणी अन्यायकारक आहे असे आंबेडकरांचे मत होते. सर्वांकडून सारखा कर वसूल करणे योग्य नाही. काही विशिष्ट रकमेपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्यांना जमीन महसुलात माफी मिळाली पाहिजे. म्हणूनच जमीन असूनही त्याचे 107 वे कलम रद्द करून जमीन महसूल प्राप्तिकराच्या पक्ष आणला पाहिजे असे विचार त्यांनी व्यक्त केले.

5. खोती पद्धती

डॉ. आंबेडकरांनी खोती पद्धतीविरुद्ध रत्नागिरी येथील दलित वर्गाच्या परिषदेत आवाज उठवला होता. प्रदेशातील शेतकऱ्यांचे रक्त शोषण थांबवून त्यांना माणुसकीचे हक्क मिळवून देण्यासाठी खोती पद्धती समूळ नष्ट केली पाहिजे असे त्यांचे मत होते. खोती पद्धती जमीन महसूल संहितेत येत नाही.हा स्वतंत्र विषय आहे असे ते मानत. जमीन कसणाऱ्या कुळांना वहीवाटीचे हक्क मिळावेत व रयतवारी पद्धत आणावी यासाठी मुंबई विधिमंडळात 1937 मध्ये त्यांनी खोती पद्धती रद्द करण्यासंबंधीचे विधेयक मांडले.

6. चलनविषयक आर्थिक विचार

1947 साली "हिस्ट्री ऑफ इंडियन करन्सी अँड बँकिंग"यामध्ये त्यांनी भारतासाठी आदर्श चलन पद्धती कोणती यावर आपले मूलगामी विचार मांडले आहेत. पण भारतासाठी आदर्श चलन पद्धती कोणती हा वाद निर्माण झाला. आंबेडकरांच्या चलनविषयक मतांचा विचार न करता भारत व इतरत्र केन्स यांच्या भूमिकेचा स्वीकार केला. परंतु आजची परिस्थिती पाहता त्यांची भूमिका निश्चितच योग्य होती. आज केंद्र सरकारची अर्थसंकल्पीय तूट वाढत असून रिझर्व बँकेला पतपुरवठा वाढवावा लागतो. त्यामुळे चलनफुगवटा व त्या अनुषंगाने येणारे भाववाढीची समस्येला तोंड द्यावे लागत आहे.चलननिर्मितीच्या क्षमतेवर अंकुश ठेवण्यासाठी त्यांची भूमिका भविष्याचा वेध घेणारी होती यात शंका नाही.

7. सार्वजनिक आयव्यय याविषयी अंबेडकरांचे अर्थिक विचार

"ऍडमिनिस्ट्रेशन अँड फायनान्स ऑफ द ईस्ट इंडिया कंपनी" व "दी इव्होल्यूशन ऑफ प्रोव्हिन्शियल फायनान्स इन ब्रिटीश इंडिया" या दोन्ही प्रबंधात त्यांचे सार्वजनिक आयव्यय विषयक विचार आढळतात. ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन व वित्तव्यवस्था यामध्ये सन १७७२ ते १८५८ मध्ये कसे बदल झाले व त्यांना कसे अन्यायकारक ठरले; याविषयी त्यांनी आपले विचार व्यक्त केले. दुसऱ्या प्रबंधातून टिश केंद्र सरकार आणि त्याकाळची घटक राज्य यांच्यातील आर्थिक संबंधाविषयी चे विचार व्यक्त होतात.

8. जलसंपत्ती व विद्युत धोरण

देशाच्या आर्थिक विकासाला हातभार हातभार लावणारे महत्त्वाचे घटक या अनुषंगाने डॉ. आंबेडकरांचे विचार अतिशय महत्त्वाचे आहेत. त्यांनी जलसंपत्तीचे नियोजन व विद्युत धोरण या संदर्भात महत्त्वाचे कार्यही केले आहे.

9. श्रमविभागणी

हिंदू समाज व्यवस्थेतील चातुर्वर्ण पद्धती ही श्रमविभागणीच्या तत्त्वावर आधारलेली आहे. यावर टीका करताना त्यांनी ही श्रमविभागणी नसून श्रमिकांची विभागणी आहे व ती अमानवी आहे असे सांगितले. जगात इतरत्र कोठेही अशी श्रमविभागणी नाही. यामुळे भारताचा आर्थिक विकास व प्रगती खुंटली आहे.

10. अस्पृश्यता एक आर्थिक पिळवणूक

जातीव्यवस्था व अस्पृश्यता यांसारख्या समस्यांचे विश्लेषण करणारे ते बहुधा पहिलेच विचारवंत असावेत. त्यांच्या मते अस्पृश्यता ही केवळ धार्मिक रचनाच नसून गुलामगिरी पेक्षा हि भयंकर आर्थिक रचना आहे. गुलामगिरीत गुलामाची किंमत कमी होऊ नये म्हणून मालक त्याला कपडेलत्ते देतो खाऊ-पिऊ घालतो पण अस्पृश्यता या रचनेत कोणतीही जबाबदारी न स्वीकारता या समाजाची आर्थिक पिळवणूक करतो. म्हणून त्यांचे स्पष्ट मत होते की, जोपर्यंत व्यावसायिक स्वरूपाचे परिवर्तन होत नाही; तोपर्यंत खालच्या वर्गामध्ये आर्थिक उत्त्थान होऊ शकत नाही..

11. महिला विकास

डॉ. आंबेडकर यांनी आर्थिक विकासामध्ये महिलांच्या योगदानाला महत्त्वपूर्ण मानले आहे. म्हणूनच त्यांनी संविधानाच्या माध्यमातून महिलांना स्वतंत्र अधिकारच मिळवून दिलेले आहेत. कारण स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या जीवनमूल्यांवर आधारित नवीन समाज रचना निर्माण व्हावी अशी त्यांची अपेक्षा होती. म्हणून त्यांनी स्त्रियांसाठी आर्थिक अधिकार, आर्थिक संरक्षण, मजुरी संबंधित कायद्यात तरतुदी केल्या आहेत. सद्य:स्थितीतील महिलांना व्यावसायिक व आर्थिक स्वातंत्र्य मिळत आहे. त्याची सशक्त आधारशीलाच डॉ.आंबेडकरांनी ठेवली आहे.यावरून असे लक्षात येते की,डॉ. आंबेडकर हे खऱ्या अर्थाने महिलांचे उद्धारक होते.

**डॉक्टर आंबेडकरांचे अर्थशास्त्रीय लेखन**

- एम.ए.ची पदवी संपादन करण्यासाठी कोलंबिया विद्यापीठात सादर केलेला प्रबंध "एडमिनिस्ट्रेशन अँड फायनान्स ऑफ ईस्ट इंडिया कंपनी"(१९१८)
- जर्नल ऑफ दि इंडियन इकॉनोमिक सोसायटी मध्ये प्रकाशित लेख "स्मॉल होल्डिंग्ज इन इंडिया अँड देअर रेमिडीज.(१९१८)

- डी एस्सी साठी सादर केलेला प्रबंध "द प्रॉब्लेम ऑफ रुपी इट्स ओरिजिन अँड इट्स सोलुशन.(१९३२ )
- एचडी साठी सादर केलेला प्रबंध ओशन ऑफ प्रोविन्शियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया 1925
- 'बहिष्कृत भारत' पत्रिकेतील अग्रलेख "महार आणि त्यांचे वर्तन" दि.३०/०९/१९२७
- 'बहिष्कृत भारत' पत्रिकेतील अग्रलेख "खोती उर्फ शेतकरी वर्गाची गुलामगिरी" दि. ०३/०५/१९२९ नागपूर

**निष्कर्ष**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार समता, स्वातंत्र्य, बंधुता या त्रिसूत्रीवर आधारित आहेत. त्यांचे लिखाण कल्याणकारी अर्थशास्त्र यावर भर देऊन श्रमाचे अर्थशास्त्र यात मोलाची भर देणारे आहेत. त्यांनी खासगीकरणपेक्षा राष्ट्रीयीकरणला महत्त्व दिले. ऊर्जा, कृषी, जल, चलन विषयक, उद्योग, नियोजन हा सारख्या महत्त्वाच्या क्षेत्रात अमुलाग्र बदल करून आधुनिक भारतीय अर्थव्यवस्थेची खऱ्या अर्थाने मुहूर्तमेढ रोवली. भारत आर्थिक दृष्ट्या महासत्ता होण्याच्या उंबरठ्यावर आहे. यासाठीचे महत्त्वपूर्ण कार्य डॉ. आंबेडकर यांनी केले असून त्यांच्या विचारांची प्रासंगिकता महत्त्वाची असल्याचे दिसून येते. डॉ. आंबेडकर कायदेतज्ञ, इतिहासतज्ञ, राजनीतिज्ञ, शिक्षणतज्ञ तसेच धर्माचे समाजशास्त्राचे जाणकार असल्यामुळे त्यांनी अहिंसावादी राज्य व समाजवाघाची संकल्पना प्रस्तुत केली. डॉ. आंबेडकरांचे अर्थिक प्रारूप आर्थिक, सामाजिक, भौतिक, धार्मिक, तंत्रज्ञान, आणि मानवतावादी मूल्यांचे मिश्रण आहे. त्यांनी आर्थिक तत्वांचे विश्लेषण अनुभव वैज्ञानिक मानदंडाच्या आधारित केले म्हणून बाबासाहेबांचे आर्थिक विचारांची आजही प्रासंगिकता आहे.

**संदर्भ**

1. डॉ. नरेन्द्र जाधव. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार अणि तत्वज्ञान.
2. डॉ. सुखदेव थोरात 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जल व विद्युत विकास, भूमिका व योगदान.
3. डॉ. भालचंद्र मुणगेकर 'डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार.
4. डॉ. एम एस खंडारे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार'.
5. प्रा. डॉ. जे. एफ.पाटील, 'आर्थिक विचारांचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर, जुलै-२००९ पृष्ठ क्रमांक:-२६० ते २७१
6. डॉ. रायखेलकर, डॉ. दामजी,' आर्थिक विचारांचा इतिहास' विद्या बूक्स पब्लिशर, औरंगपुरा, औरंगाबाद जून २०११, पृष्ठ क्रमांक: ३०५ ते ३११
7. डॉ. वा. भा. पाटील, 'भारतीय राजकीय विचारवंत', श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९८, पृष्ठ क्रमांक:-१९६-१९७